# आरएसएस जनकल्याण समितीला रुग्णवाहिका समर्पित

**प्रतिनिधी / पनवेल**

भारतातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा वाढवण्याच्या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या क्विक हिल फाउंडेशन या सीएसआर शाखेने पनवेल येथील आरएसएस जनकल्याण समितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच, आरोग्ययान उपक्रमाअंतर्गत, क्विक हिलने रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना चांगल्या आरोग्य सेवा पुरवण्याकरिता ॲम्ब्युलन्स दान केली.

आरएसएस जनकल्याण समिती आदिवासी भागातील लोकांकरिता आरोग्य सेवा पुरवण्याचे काम करत असून विविध योजना राबवित आहे. क्विक हिल टेक्नोलॉजीजचे एमडी आणि सीईओ कैलाश काटकर, सीएसआर ॲक्टिव्हिटी आणि आरोग्ययानाच्या अनुपमा काटकर आणि पनवेलचे डेप्यु. कमिशनर विठ्ठल डाके, असिस्टंट कमिशनर धैर्यशील जाधव, आरएसएस जनकल्याण समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर आणि उपाध्यक्ष विनायक दंभीर यांच्या उपस्थितीत ही रुग्णवाहिका देण्यात आली.

क्विक हिलचे अत्याधुनिक आरोग्ययान रायगड जिल्ह्यातील आदिवासी भागातील लोकांना सेवा देणार असून यात सर्व खेड्यापाड्यांचा समावेश आहे. अति दुर्गम भागातील डॉक्टर आणि रुग्णांना ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरेल. तसेच, रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकांना नियमित तपासणी, निदान आणि उपचार यासारख्या आरोग्य सेवा पुरवल्या जाणार असून या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून नागरिकांची सेवा करण्याचा आनंद मिळत असल्याचे एमडी आणि सीईओ कैलाश काटकर यांनी सांगितले.